माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये प्राप्त झालेली तक्रार

**तक्रार क्रमांक : १५८/२०२२**

**तक्रारकर्ता, श्री. प्रशांत निंबराव डोंगरे,**

--विरुध्द--

**जन माहिती अधिकारी, तथा कनिष्ठ प्राध्यापक**
**लाल बहादुर विद्यालय, बाम्हणी ता. उमरेड जि. नागपूर -४४१२०३**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**लाल बहादुर विद्यालय, बाम्हणी ता. उमरेड जि. नागपूर -४४१२०३**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १०.०१.२०२४**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| ०५.०५.२०२२ | --- | ०८.०७.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. ७२५/२०२०, ७२६/२०२०, ७२७/२०२०, ७२८/२०२०,७२९/२०२०, ७३०/२०२०, ७३१/२०२०, ७३२/२०२० मध्ये दिनांक ०५.०५.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १०.०१.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा पर्यवेक्षक, लाल बहादुर विद्यालय, बाम्हणी ता. उमरेड जि. नागपूर श्री. संजू मन्साराम लूटे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक, लाल बहादुर विद्यालय, बाम्हणी ता. उमरेड जि. नागपूर श्री. गिरीधर मोतीराम चौके उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. ७२५/२०२०, ७२६/२०२०, ७२७/२०२०, ७२८/२०२०,७२९/२०२०, ७३०/२०२०, ७३१/२०२०, ७३२/२०२० मध्ये दिनांक ०५.०५.२०२२ रोजी सुनावणी घेवून " जनमाहिती अधिकारी तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अर्जावर विहित वेळेत नियमानुसार

कार्यवाही होईल याची दक्षता संबंधितांनी घ्यावी अन्यथा त्याचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये शास्ती व शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल याबाबत संबंधितांना सक्त ताकीद देण्यात येत आहे. तसेच अपिलार्थी यांनी वरील आठही प्रकरणात जोडपत्र-अ नुसार मागणी केलेली माहिती कलम ८ ज (१) अंतर्गत येणारी त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती वगळून संपुर्ण माहिती अपिलार्थीस सदर आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून दोन आठवड्याच्या आत विनामुल्य पुरवावी व त्याचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा," असे आदेशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक ०७.०७.२०२२ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. द्वितीय अपील क्र. ७२५/२०२०, ७२६/२०२०, ७२७/२०२०, ७२८/२०२०,७२९/२०२०, ७३०/२०२०, ७३१/२०२०, ७३२/२०२० मध्ये दिनांक ०५.०५.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशात, अपिलार्थी यांनी वरील आठही प्रकरणात जोडपत्र-अ नुसार मागणी केलेली माहिती कलम ८ ज (१) अंतर्गत येणारी त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती वगळून संपुर्ण माहिती अपिलार्थीस सदर आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून दोन आठवड्याच्या आत विनामुल्य पुरवावी असे आदेशित केले. परंतु तक्रारकर्ता यांनी सदर आदेशाचे अनुपालन झाले नसल्यामुळे तक्रार अर्ज दाखल केला. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक , लाल बहादूर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, ब्राम्हणी ता. उमरेड जि. नागपूर यांनी दि. १४.१२.२०२२ रोजी अनुपालन अहवाल सादर केला असून प्रकरण निहाय खुलासा सादर केला आहे. तसेच आज दि. १०.०१.२०२३ रोजी सादर केलेल्या अहवालात अनुपालनाचा तपशिल देण्यात आला आहे.

सादर कागदपत्राचे अवलोकन केले असता, प्रस्तुत प्रकरणी मा. **उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र. ५०९३/२०१८, विश्वास एज्युकेशन सोसायटी —वि- राज्य माहिती आयोग, नागपूर या प्रकरणात दिनांक २४.०४.२०२३ रोजी** पारीत केलेल्या आदेशात दिलेले दिशानिर्देश लक्षात घेता, प्रस्तुत प्रकरणी आयोगाने पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले असल्यामुळे प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १०.०१.२०२४**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
★नागपूर★

**जा.क्र.** 2065 **दि.** 4 APR 2024



G:\SS/ तक्रार १०.०१.२०२४\१५८-२०२२ श्री. प्रशांत डोंगरे.docx